**Special Issue**
Jan -2016

ISSN -2250-0383
IMPACT FACTOR - 0.421

# International Multi Disciplinary Research Journal

# शोधांकन



## भारताच्या जडणघडणीत महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

प्रकाशक
डॉ. प्रदीप पाटील

संपादक
डॉ. दत्तात्रय वाबळे

Scanned by CamScanner

| अ.क्र. | नाव | शीर्षक | पा.क्र |
|---|---|---|---|
| 34 | डॉ. फुलचंद भा. सलामपुरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राज्य समाजवादाची संकल्पना | 106 - 10 |
| 35 | प्रा.नंदा राशिनकर | महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण | 109 - 11 |
| 36 | डॉ. संदीप सांगळे | प्रेरक विचारांचा स्त्रोत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 111 - 11 |
| 37 | डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल | महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकर यांचे वैचारिक साम्य व भेद | 114 - 11 |
| 38 | डॉ. सुरेश बी. ढाके<br>श्री. राजरत्न भिमराव पोहेकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषक विचार | 117 - 12 |
| 39 | डॉ. प्रभाकर जगताप | डॉ. बाबासाहेब आंबेकरांचा शैक्षणिक ठेवा... | 121 - 12 |
| 40 | कु. जयश्री प्रल्हाद शिंदे<br>डॉ. सुहास सखाराम पाठक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे<br>शैक्षणिक विचार व कार्ये | 125 - 12 |
| 41 | प्रा.डॉ. प्रिया भा. बोचे | महात्मा गांधी आणि महिला सक्षमिकरण | 128- 129 |
| 42 | प्रा. डॉ. राजु भागाजी वनारसे | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | 130- 133 |
| 43 | डॉ.विनोद बाबुराव बोरसे | ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ'' | 134- 136 |
| 44 | प्रा. संजय पंढरीनाथ गायकवाड | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक योगदान | 137- 139 |
| 45 | प्रा.संजय पां. हराळे | महात्मा गांधी आणि महिला सक्षमिकरण | 140- 141 |
| 46 | प्रा. दुधकवडे एस.आर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ | 142- 143 |
| 47 | प्रा.राजकुमार रिकामे, | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाहीतील योगदान | 144- 145 |
| 48 | डॉ. किशोर एन.धाबे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित शेतकरी कामगार कष्टकरी चळवळ | 146- 146 |
| 49 | प्रा. दिगंबर गंगावणे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक आणि शैक्षणीक योगदान | 147- 148 |
| 50 | प्रा. डॉ. उमाकांत राठोड | म. गांधी यांचे स्वातंत्र लढयातील योगदान | 149- 151 |
| 51 | डॉ. सुरेश बी. ढाके<br>श्री. राजरत्न भिमराव पोहेकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषक विचार | 152- 156 |
| 52 | प्रा. पाटील सोमनाथ वसंतराव | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार आणि शाश्वत विकास | 157- 160 |
| 53 | प्रा. श्रीमती विजया जाधव | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय | 161- 163 |
| 54 | प्रा. रविंद्र सुदाम भगत | सामाजिक न्यायाच्या संवर्धनाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | 164- 166 |
| 55 | प्रा. धिरज भिमशा शाखापुरे | महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार | 167- 169 |
| 56 | प्रा साळवे जी | डॉ बाबासाहेब आंबेडकराचे आर्थिक विचार व योगदान | 170- 172 |
| 57 | प्रा. रवंदळ भाऊसाहेब बाबुराव | महात्मा गांधीजींचे अर्थ विचार | 173 -174 |
| 58 | डॉ. किरण प्रकाश काळे | राष्ट्रीय उभारणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान | 175 -176 |
| 59 | डॉ.पानसरे आर.आर.<br>प्रा. गायकवाड विजय विष्णु | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय<br>एकात्मता विषयीचे विचार | 177 -179 |
| 60 | प्रा. मिलिंद विठ्ठल खांदवे | डॉ बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक न्याय | 180 -182 |
| 61 | प्रा. सचिन अभिमन्यू ओहोळ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेस्त्रिवादी विचार | 183 -185 |
| 62 | प्रा. राहुल पंडित | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या<br>माध्यमातून उभारलेली शेतकरी चळवळ | 186 -189 |
| 63 | प्रा. सचिन गोवर्धन कांबळे | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मा.गांधीजींचे सत्याग्रह तंत्र: एक अभ्यास | 190 - 19 |
| 64 | श्री. विष्णू बाळकृष्ण वहाटुळे | महाराष्ट्राच्या जडणघडनीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या<br>शैक्षणिक विचारांचे योगदान. एक ऐतिहासिक अध्ययण | 192 -194 |
| 65 | श्री. अनिल संपतराव जाधव | प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर – एक समाजशास्त्रज्ञ | 195 -197 |
| 66 | मनिषा खरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक योगदान | 198 -200 |
| 67 | रंदिल विलास कचरू | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | 201 -202 |


Scanned by CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून उभारलेली शेतकरी चळवळ:-

**प्रा. राहूल पंडित**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर.

प्रस्तावना:—

सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून सर्वहारा वर्गाना संघटित करुन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक क्रांतिकारक चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून उभारली. ती जशी सामाजिक चळवळ होती, तशीच आर्थिक व राजकीय स्वरुपाची सुध्दा होती. या पक्षाच्या जाहीरनाम्यात व पक्ष कार्यक्रमात हा सर्वहारा वर्ग मध्यवर्ती बघावयास मिळतो. कॉंग्रेस हा जमीनदार व भांडवलदार वर्गाचा पक्ष असून तो या वर्गाच्या हिताची ठोस कोणतीच धोरणे घेणार नाही. हे अनेक प्रसंगातून दाखवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. वर्गीय जाणिवेवर आधारित राजकारण करीत असतांना शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, स्त्रिया, अस्पृश्य वर्गाच्या आर्थिक व सामाजिक राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक लढयांची व क्रांतिकारक चळवळींची निर्मिती केली. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत आमुलाग्र बदल होऊन सुधारणा होणार नाही, तोपर्यंत हा देश खऱ्या अर्थाने सुखी होणार नाही,असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधीमंडळ व विधीमंडळाच्याबाहेर शेतकरी, कष्टकऱ्यासाठी अनेक लढयांची निर्मिती केली. कॉंग्रेस पक्षाशी समोरा&समोर दोन हात करतांना मुंबई विधीमंडळात शेतकऱ्यांचे कर्ज निवारण, कुळकायदा, जमीन महसुल, तंबाखूवरील कर, कर्ज तहकुबी आणि करवाढ अशी महत्वपूर्ण बिले चर्चेला आणली. त्यावर अभ्यासपूर्ण व वास्तविक परिस्थितीचे दाखले देऊन आपली व आपल्या पक्षाची मते मांडली. १३ सप्टेंबर १९३७ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विराट मोर्चा काढून कौन्सिल हॉलला वेढा दिला. १७ नोव्हेंबर १९३७ रोजी खोती&जमीनदारी नष्ट करण्याचे मुंबई विधीमंडळात बिल मांडले. स्वतंत्र मजूर पक्षाचे मुखपत्र 'जनता'तून शेतकऱ्यावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. यापुर्वी भारताला १९३५ च्या अधिनियमाप्रमाणे प्रांतिक स्वातंत्र्य मिळाल्यावर 'जमीनदारी नष्ट करणारे विधेयक' भारतात सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १७ सप्टेंबर १९३६ साली मुंबई कायदेमंडळात मांडले.''[१]

पुणे अधिवेशनात दि. १९/०९/१९३७ रोजी खोती नष्ट करणारे बिल मांडल्यानंतर आपल्या तीन मिनीटांच्या भाषणात समर्थनामध्ये काही मुद्याद्वारे खोत हे शेतकऱ्यांची किती निर्दयपुर्वक पिळवणूक करतात, हे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. त्याबाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,''खोती पध्दती रत्नागिरी जिल्हा आणि कुलाबा व ठाणे जिल्हयातील काही भाग यांच्यात चालू आहे. खोताने कुळाकडून सारा वसूल करावयाचा व सरकारला ठरलेली रक्कम दयावयाची कुळाकडून वसूल करण्याची रक्कम खोताने ठरवायची असल्याने खोत कुळाकडून हवी तशी रक्कम जबरदस्तीने वसूल करतात. कुळांनी या पध्दतीविरुध्द चळवळ चालवलेली आहे. तेंव्हा खोती पध्दत बंद करावी आणि सरकारने खोताला नुकसान भरपाई दयावी आणि कुळांकडे जमिनी ठेऊन त्यांना शेतीसाठी आर्थिक सहाय्य दयावे.''[२]

या बिलाला सरकार मार्फत श्री. एस. एल. करंदीकर यांनी विरोध केला. व शासन आगामी काळात 'लॅंड रेव्हेन्यु' संबंधी बिल आणणार आहे व त्यात खोती पध्दतीचाही विचार केला जाणार आहे. तेंव्हा त्यासाठी स्वतंत्र बिलाची आवश्यकता नाही, असे मत मांडले. डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षांच्या असे निदर्शनास आणून दिले की, सरकार ज्यावेळेस हे बिल सभागृहात आणिल व त्या बिलात जर माझ्या बिलाप्रमाणे तरतुदी असतील तर हे बिल मी परत घेईन व हे बिल मांडण्यास अध्यक्षांनी परवानगी दिली परंतु सरकारने त्या बिलाची जास्त दखल घेतली नाही. हे बिल पास होण्याकरिता जनमताचा रेटा तयार करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्यावतीने कणकवली व चिपळून येथे शेतकऱ्यांच्या जाहीर सभा घेतल्या. कणकवली, रत्नागिरी येथील परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले,''खोतीचे बिल नापास झाले तर कुळांनी पुढील मक्ता देऊ नये, बिल नापास झाले तर सत्याग्रह करुन मी तुरुंगवास पत्करणार[३] असे उद्‌गार काढले.''

त्यानंतर १६ मे १९३८ रोजी चिपळून परिषदेत डॉ. आंबेडकर अधिक आक्रमक होऊन कॉंग्रेस पक्षावर टिका करतात. कॉंग्रेसने निवडणुकांच्या वेळी दिलेली अभिवचने पाळली नाहीत. कॉंग्रेसच्या या धोरणामुळे गेली दहा महिने खोती बिलासारखे अत्यंत महत्वाचे बिल पडून आहे. कॉंग्रेस हे शेटजी भटजींच्या पैशावर चालत आहे. तेंव्हा मला या मुठभर शेटजी भटजीचे राज्य नको तर,''मला तुमच्यापैकी एखादी व्यक्ती प्राईम मिनिस्टर झालेली पाहावयाची आहे.[४] तुम्ही खोतांच्या विरोधात संपूर्ण



Scanned by CamScanner

ताकतीनिशी उभे राहिले पाहिजे. त्यांनी अरे म्हटल्यावर आपण त्यांना कारे द्वारे प्रति उत्तर दिले पाहिजे. यासाठी सर्वांनी जातीभेद, धर्मभेद विसरुन खोत्यांच्या विरोधात समर्थपणे उभे राहिले पाहिजे. ''काही खोत कुळास म्हणतात की, तुझा आंबेडकर काय करतो ते पाहुन घेईन. हे खोत माझी व त्यांची लायकी सारखीच समजतात काय? कोणताही खोत माझ्यापुढे आल्यास मी सहजा&सहजी त्याचा पाडाव करीन ते माझी व त्यांची स्वत:ची तुलना करीत असल्यास मी म्हणेन कोठे मी हिमालय पर्वत व कोठे हा मुतखडा.''

यांप्रकारे आक्रमक शैलीतून त्यांनी खोतींच्या विरुध्द आपली मते व्यक्त केली. विधीमंडळात कॉंग्रेस पक्षाचे सदस्य जास्त असल्याने आम्ही मांडलेले बिल ते पास करतील काय? याबाबत शंका आहे. जर त्यांनी बिल पास नाही केले तर तुम्ही खोतास 'मक्ता' देण्याचे बंद करावे, असेही आव्हांन केले व सदैव माझ्या पक्षाचे कार्यकते हे तुमच्या हिताकरिता झटतील व प्रसंगी तुरुंगातही जातील. ''कुळांना पिढ्यानपिढ्या स्वतंत्र मजूर पक्षाशी संबंध कायम ठेवण्याचे सुचविले.' या स्वतंत्र मजूर पक्षाचे अंतिम ध्येय हेच आहे की येथील सर्वहारा वर्ग शेतकरी ,कामकरी, मजूर, अपृश्य या सामाजिक व आर्थिक सर्वहारा वर्गाच्या हातात सत्ता गेली पाहिजे व त्यांचे सरकार स्थापन झाले पाहिजे.''

स्वतंत्र मजूर पक्ष शेतकऱ्यांचे प्रश्न अत्यंत गाभिर्यपुर्वक घेऊन लढत होता. जास्तीत जास्त शांततेच्या माध्यमातून हे प्रश्न सुटले पाहिजेत यावर भर होता. नंतर १३ सप्टेंबर १९३७ रोजी श्री. दौलतराव जाधव, श्री. राजाराम भोळे, श्री. अनंतराव चित्रे, श्री. शामराव परुळेकर यांनी आपल्या नेतृत्वात लाल बावटयाच्या सहाय्याने अस्पृश्य कामगार व शेतकरी यांची मिरवणूक काढून पुण्यात मुंबई कायदेमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना कौन्सिल हॉलला गराडा दिला होता. सहभागी शेतकऱ्यांनी व कामगारांनी शेतसारा तहकुबी करणे, कर्ज तहकुबी ताबडतोब करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जिंदाबाद अशाप्रकारच्या घोषणा दिल्या होत्या. अहमदनगर येथून आलेल्या मिरवणुकीचे नेतृत्व कोळसे पाटील यांनी केले होते. या मिरवणुकीत श्री. इंदुलाल याज्ञिके, श्री. भाई डांगे, श्री. पोतनीस, श्री. बुखारी, श्री. चितळे, भाई भुस्कुटे, डॉ. भुतकर इत्यादी मंडळी सामील झाली होती. त्या मिरवणुकीच्या आग्रभागी कोयता व हातोडा यांचे चित्र काढले होते.' तारीख १ जानेवारी १९३८ रोजी रत्नागिरी जिल्हा तिलोरी कुणबी परिषद भरली असतांना तेथे उपस्थित असलेल्या तिलोरी कुणबी, महार, मुसलमान, शेतकरी यांच्या १५ हजाराच्यावर समुदयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश वाचवून दाखविण्यात आला. त्या संदेशात शेतकरी वर्गानी आपआपसातले मतभेद दुर करुन आपली संघटना उभारली पाहिजे. आणि शेतकऱ्यांची बाजु घेणारा स्वतंत्र मजूर पक्ष असून या पक्षात सामील व्हा, असा आशय होता. तो संदेश १ व ८ जानेवारी १९३८ च्या जनता पत्रात प्रसिध्द करण्यात आला होता.

शेतकरी चळवळ अधिक तीव्र करीत स्वतंत्र मजूर पक्ष व इतर शेतकरी संस्थानी सहकार्य करुन एक मोर्चा कमिटी निवडून मुंबई कौन्सिल हॉलवर कोकण, सातारा, नाशिक वगैरे जिल्हयातील शेतकरी बांधवाचा अपुर्व मोर्चा कौन्सिलवर नेण्याचे ठरविले होते. त्यानुसार सोमवार ता. १० जानेवारी १९३८ रोजी वरील ठिकाणचे सर्व शेतकरी आपल्या मिरवणुकी घेऊन दुपारी दीड वाजता आझाद मैदानावर जमले. कोकणातून आलेले शेतकरी बांधव 'व्हिक्टोरिया डॉक' मधुन बोरीबंदर पुढील मैदानावर हजर झाले. इतर शेतकऱ्यांचे गट परळ येथील कामगार मैदानावर जमून ते प्रचंड मिरवणुकीने आझाद मैदानावर आले. या मिरवणुकीबरोबर खोती पध्दती नष्ट करा. सावकारशाहीला मुठमाती दया शेतकऱ्यांचा विजय असो वगैरे आशयाच्या मोठमोठया पताका फडकत होत्या.'

पाहता&पाहता शेतकऱ्यांच्या मिरवणुकीत २० ते २५ हजारापर्यंतचा जमाव जमला. या जमावाला शिस्त राखण्याचे काम भाई चित्रे, याज्ञिके, परुळेकर, पोतनीस, प्रधान, मिरजकर, लालजी पेंडसे, सुरबा टिपणीस, मडके बुवा जाधव, राजाराम भोळे, डॉ. भोईर यांनी केले. आपल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले, ''कष्टाळू लोकांची संघटना करावयाची झाल्यास त्यात जातीभेद, धर्मभेद यांना मुळीच थारा मिळता कामा नये. हा कष्टाळूवर्ग अगोदरच बिकट आर्थिक दडपणाने दडपला गेलेला आहे. मी म्हणत आहे त्याप्रमाणात अशा तऱ्हेचे सर्व जातींच्या कष्टाळूवर्गाचे हे संघटन पाहून मला आनंद होत आहे. म्हणूनच आजचा दिवस मी मोठया भाग्याचा समजतो. कारण की, आजची आपली संघटना केवळ स्वार्थ त्यागाच्या बळावर उभारलेली आहे. श्रमजिवीवर्गाने कॉंग्रेससारख्या श्रीमंत वर्गीय पक्षावर विश्वास ठेऊ नये. आपणास माहितच आहे की, या जगात ज्याचे घर पेटते, ज्यांच्या घराला आग लावली जाते, त्यांचे व जो आग लावतो, त्यांचे कधीतरी संगनमत होईल काय? आपण साधारणपणे प्राणीमात्राकडेही दृष्टी फेकली तरी साप व मुंगुस कधीतरी एकत्र होऊ शकतील का? तसेच उंदीर&मांजरांची मैत्री जमेल का? अशारितीने निसर्गविरुध्द सृष्टी निर्माण करण्याविषयी आपण कधीतरी विश्वास बाळगाल का? आणि आपण त्याच दृष्टीने श्रीमंताची पाठीराखी कॉंग्रेसकडे पाहिले पाहिजे. कॉंग्रेसचे जवळपास सर्वच सभासद सावकार, जमीनदार आणि खोत श्रीमंत असेच आहेत. देण्यात बटटा करणारे लोक गरीबांच्या कल्याणाची गोष्ट करु शकणार नाहीत. मते मागत असतांना तुमच्या हिताचे काम करु, असे म्हणणारे आता तुमच्याकडे ढुंकुनही पाहत नाहीत. त्यासाठी तुम्ही



Scanned by CamScanner

सावध असले पाहिजे. खरे पाहिले तर जगात फक्त दोनच जाती आहेत. पहिली श्रीमंताची व दुसरी गरीबांची या शिवाय तिसरा वर्ग म्हटला म्हणजे मध्यम वर्ग होय. ''जगातल्या कोणत्याही उज्वल चळवळीच्या नाशास हाच वर्ग कारणीभूत होत असतो.'' आपल्या अज्ञानामुळे २० टक्के लोक ८० टक्के लोकावर राज्य करतात. त्यासाठी जागृत झाले पाहिजे. कॉंग्रेस तर तुमच्या हिताची कोणतीच धोरणे घेणार नाही व आमच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे १४&१५ सभासद आहेत. इतक्या कमी बळावर कायदे पास करुन घेणे अशक्य आहे. तेंव्हा भांडवलदार वर्गाच्या लोकांना मते देऊ नका. जात &पात विसरुन आपली संघटना सक्षम करा. कोकणातील स्थिती लक्षात घेतली तर तेथील खोत संख्येने कमी असतांना १३ लक्ष शेतकऱ्यांवर  हुकूमत चालवतात.

या प्रचंड मोर्चाला संबोधित केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या शिष्टमंडळासहित मुख्यमंत्री ना.खेर यांना भेटले. त्याप्रसंगी शेतकऱ्यांच्या पुढील मागण्या सादर केल्या.

मूलभूत मागण्या १.शेतकरी वर्गाला स्वतंत्रपणे व सुखासमाधानाने राहता यावे म्हणून जमिनीची प्रत्यक्ष मशागत करणाऱ्यालाच त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे.२.जमिनीची मशागत करुन तीवर जगणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल तर असेल व त्यांच्या आर्थिक हिताची व्यवस्था व्हायची असेल तर खोत इनामदारांसारखे (जमिनदार) मध्यस्थ नसले पाहिजेत.

३.जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यावर कर अगर पट्टी बसविण्यापूर्वी त्याला चरितार्थापुरती योग्य ती सोय करुन देणे हे सरकारने आपले कर्तव्य मानले पाहिजे.४.त्याचप्रमाणे शेतमजूरांना किमान मजुरी देण्याची कायद्याने सोय करुन त्यांच्या हिताला जपणे हेही लोकमतवादी सरकारचे कर्तव्यच आहे.

तातडीच्या मागण्या ५.ज्याप्रमाणे थकलेल्या शेतसारा बाक्या माफ करण्यात आल्या. त्याचप्रमाणे आजपर्यंत थकलेल्या बाक्याही ताबडतोब माफ करण्यात याव्यात.६.जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्नावर सारा अजिबात माफ करावा व किमान उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या जमिनीवर वाढत्यामानाने साऱ्याची आकारणी करण्याच्या दृष्टीने जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती झाली पाहिजे. ज्याप्रमाणे बाजारभाव उतरले असल्यामुळे ही दुरुस्ती होईपर्यंतच्या ज्यांना सालिना ७५ रु अगर त्यापेक्षा कमी शेतसारा द्यावा लागतो. त्यांचा सारा ताबडतोब ५० टक्क्यांनी कमी केला पाहिजे. ७.खोतीपध्दती व ईनामदारीपध्दती हया आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक व सामाजिकदृष्ट्या जुलमी असल्यामुळे हया पध्दती भरपाईसह अगर भरपाईशिवाय नष्ट करण्यासाठी कायदा करण्याची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे. त्याचप्रमाणे कुळाकडून खंड वसूल करण्यासाठी व त्यांना छळण्यासाठी जमीनदार जे जे मदती दाव्यांसारखे जुलमी उपाय योजतील अगर योजण्याचा बेत करतील ते ते सर्व ताबडतोब बंद पडले पाहिजे व सरकारने ह्यासाठी योग्य ती व्यवस्था करावयास पाहिजे. ४.(१) तीन वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायमकुळ समजले जावे, असा कायदा सर्व जमिनदारांच्या कुळांना लागू केला पाहिजे.या कायद्याला बगल देण्याची कारवाई जमीनदारांना करता येऊ नये. म्हणून एक लॅंड कमिशन नेमण्यात यावे व या कमिशनच्या परवानगी खेरीज कुळाच्या अंगाखालील जमीन काढून घेतली जाता कामा नये. कुळे जोपर्यंत खंड देत आहेत, तोपर्यंत त्यांच्याकडे तीन वर्षे असलेली जमीन कोणत्याही सबबीवर काढून घेतली जाता कामा नये. २. सा&यांच्यामानाने फक्त तिसरा हिस्सा अधिक खंड घ्यावा. जास्त खंड कुळांकडून घेता येऊ नये. ५. लहान शेतकऱ्यांची पाणीपटटी ५० टक्क्यांनी कमी केली पाहिजे. बहुसंख्य लहान लहान शेतकरी व कुळे यांना फायदेशीर होईल, असे धोरण इरिगेशन खात्याने चालविण्याच्या दृष्टीने इरिगेशन कायदयात दुरुस्ती केली पाहिजे. ६. सर्व खेडयांना मोफत चराई राने असावीत. ७. कर्ज निवारणाचा योग्य तो कायदा सर्वत्र लागू होईपर्यत कर्ज तहकुबी जाहीर करावी.८. शेतकऱ्यांच्या हातून सावकारांच्या हाती जमीन जाऊ नये. या दृष्टीने सावकारावर बंधने घालावीत.९. शेतकऱ्यांच्या निर्वाहासाठी लागणारी किमान जमीन व त्यांच्या चरितार्थाला लागणाऱ्या वस्तुवर सावकारी जप्ती आणण्यास बंदी झाली पाहिजे.१०. वयास आलेल्या सर्व स्त्री पुरुषास मताधिकार.११. वेठबिगार करुन घेणे व बेकायदेशीररितीने पैसे उकळणे हे फौजदारी गुन्हे ठरविले पाहिजेत.१२. जमीन महसुल खात्यातील सर्व मॅजिस्ट्रेटी अधिकार काढून घ्यावेत.१३. कसता येण्याजोगी सर्व पडित जमीन उपरी शेतमजुरांना मोफत वाटून दयावी.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून शेतकरी वर्गात जाणीव जागृती निर्माण करुन त्यांचे शोषण कॉंग्रेस कशाप्रकारे करीत आहे, हे स्पष्ट केले. कुणबी वर्गाने मोठया संख्येने स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद व्हावेत. कारण हाच पक्ष कामकरी व शेतकरी वर्गाचे हित साधणारा पक्ष आहे.  खोती पध्दती ही एक गुलामगिरी आहे व या बाबतीत किती अन्याय होतात ,किती दु:ख भोगावी लागतात, हे तुम्हाला ठाऊक आहे. खोती नष्ट करण्याबाबत कॉंग्रेसने पुढाकार घेतला नाही. यावरुन कॉंग्रेस कोणाचे हे तुमच्या लक्षात येईल. कॉंग्रेसची बढती यापुढे होणार नाही. स्वतंत्र मजूर पक्ष हे झाड आज लहान असले तरी ते झपाटयाने वाढणार आहे. तुम्ही त्याच्या छायेला बसणार असून सर्व ब्राम्हणेत्तर श्रमजीवी जनताही बसणार आहे.''[१०]

२० मे १९३८ रोजी महाड, गाडीतळात भरलेल्या जाहीर सभेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना



Scanned by CamScanner

डॉ. बाबासाहेब म्हणतात.,''कॉंग्रेसने विधीमंडळात निष्फळ व निरुपयोगी बिले मांडून पास केली व त्यात वेळ घालून लोकांना झुलवित ठेवले. शेतकऱ्यांनी काढलेल्या मोर्च्याला घाबरुन त्यांनी जमीन विकण्यास बंदी करणारे बिल पास केले. स्वतंत्र मजूर पक्षामार्फत मांडलेल्या शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक उपसुचना विचारात घेतल्या नाही. शेठ सावकाराच्या पैशावर निवडून आलेली कॉंग्रेस तुमचे कधीही हित साधणार नाही व वरील कृत्यावरुन असेच दिसते की, त्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे.मी खोती नष्ट करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करीन.कारण खोती नष्ट करण्याचे मी हाती कंकण बांधले आहे. मी व माझे स्वतंत्र मजूर पक्षाचे सहकारी प्रसंगी तुरुंगात जाऊ. पण तुम्ही जर आमच्या सोबत आलात तर खोती नष्ट करायला काहीच वेळ लागणार नाही.

दि. १२ ऑक्टोबर १९३९ रोजी सरकारी पक्षाने शेतकऱ्यांचे कर्ज निवारण विधेयकाचा मसुदा मुंबई कायदेमंडळात मांडला.[११] शेतकऱ्यांना स्वस्त न्याय मिळावा याची तरतूद करावी. शेतकऱ्याच्या बरोबरीनेच गवत कापणारे, लाकूड तोडणारे यांनाही त्यांचा फायदा मिळावा. शेतकऱ्यांना कर्जावर ५० टक्के सुट मिळावी इ.चा समावेश करता येतो.

दि. ४ फेब्रुवारी १९३९ रोजी मुंबई विधान सभेत कुळांना संरक्षण देणारे बिल मांडले गेले. त्या बिलावर चर्चा करतांना स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांनी असे मत व्यक्त केले की, कुळांना संरक्षण देण्यासाठी लादलेल्या अटी अनिष्ट आहेत. या धोरणामुळे कुळ वर्ग निराश होईल. या बिलाला विरोध करतांना खालील मुदयावर स्वतंत्र मजूर पक्षाचा आक्षेप होता.

१) बिलाची व्याप्ती अत्यंत मर्यादित होती.२) खंड ठरविण्याची योजना अत्यंत सदोष होती. ३) कुळांना संरक्षण देण्यासाठी त्याच्यांवर लादलेल्या अटी अनिष्ट होत्या''[१२]

स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून एकूणच शेतकरी वर्गास न्याय देण्यासाठी प्रयत्न केला गेला. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले समाजकारण , राजकारण करतांना या वर्गाला डोळयापुढे ठेऊनच एक व्यापक लढा उभारला होता.

संदर्भः—

१. गायकवाड प्रदिप(संपादक),(२००३),डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे खंड.२, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर. पृष्ठ क्र.५
२. खैरमोडे चां.भ., (१९९८), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड ७, सुगावा प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र. &८२
३. गोखले द.न., (२००६), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अंतरंग, मौज पृकाशनगृह, मुंबई. पृष्ठ क्र.&२०९
४. पवार ज.वी., (२०१३), विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मेत्ता प्रकाशन, मुंबई.पृष्ठ क्र. &१०१
५. खैरमोडे चां.भ. , (१९९८), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड ७, सुगावा प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र.&६३
६. 'जनता' दि. २८/०५/१९३८
७. डॉ.नरवडे शेषराव, (२०११), डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६&१९४२), निर्मल प्रकाशन, नांदेड. पृष्ठ क्र &६३
८. मून वसंत, नरके हरी, प्रा. गोडघाटे अशोक, प्रा. डॉ. कासारे म.ल.,कांबळे एन. जी.(संपादक), (२००२),डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड&१८, भाग&२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र&साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन.पृष्ठ क्र.&७२
९. कित्ता पृष्ठ क्र.& ७२ ते ७८
१०. गायकवाड प्रदिप (संपादक), (२००३), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे खंड.२, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर. पृष्ठ क्र.१२१,१२२
११. डॉ.नरवडे शेषराव, (२०११), डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष (१९३६&१९४२), निर्मल प्रकाशन, नांदेड. पृष्ठ क्र. ५६



Scanned by CamScanner

**Special Issue**
Jan -2016

ISSN -2250-0383
IMPACT FACTOR - 0.421

# International Multi Disciplinary Research Journal

# शोधांकन

विशेषांक

राज्यशास्त्र विभाग आयोजित आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र

## भारताच्या जडणघडणीत
## महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## यांचे योगदान

दि. १५ व १६ जानेवारी २०१६

**संपादक**

**डॉ. दत्तात्रय वाबळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

**सहसंपादक**

**डॉ. पद्माकर गोरे**
इतिहास विभाग प्रमुख

**प्रा. सोमनाथ पाटील**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

**प्रकाशक**

**डॉ. प्रदीप पाटील**
प्राचार्य

**प्रा. पराग चौधरी**
उपप्राचार्य

**साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय**
तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे.

( The Editor, Editorials Board & Publisher assume no responsibility for statements and opinions expressed by the authors in this souvenir Abstract)

Scanned by CamScanner